जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३९ दिनांक -१५/०१/२०२४**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## खुन करणा-या अज्ञात आरोपीचा छडा लावुन त्यास ०८ तासामध्ये केले जेरंबद

दि.१३/०१/२०२४ रोजी सकाळी कात्रज भाजी मंडई पुणे-सातारा रोड,कात्रज,पुणे कडून संतोषनगर कडे जाणा-या रस्त्याच्या बाजूला फिर्यादी यांचे वडिल मनोहर बागल यांना कोणीतरी अज्ञात इसमाने दगड किंवा कशाचे तरी सहायाने मारहाण करुन,त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारले आहे. म्हणून फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुध्द **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे गुन्हा रजि नंबर ४५/२०२४ भा.दं.वि. कलम ३०२** अन्वये अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने लागलीच वरिष्ठांनी घटनास्थळी भेट देवून तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अज्ञात आरोपीचा शोध घेणेसंदर्भात योग्य त्या सुचना व मार्गदर्शन केले होंते. त्यानुसार भारती विदयापीठ पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी,अंमलदार यांनी घटना स्थळाचे आजूबाजूचे सीसीटीव्ही कॅमे-याव्दारे तसेच गोपनीय बातमीदारामार्फत माहिती घेत असताना,**पोलीस अंमलदार, हर्षल शिंदे, सचिन गाडे, धनाजी धोत्रे,** यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा इसम नामे **किसन छगन मरगळे वय-२१ रा.साईनगर गल्ली नं.०३ सच्चाईमाता पाण्याचे टाकीजवळ आंबेगाव बु. पुणे** याने केला आहे. व सदरचा आरोपी हा तळजाई पठार जंगलामध्ये अंधारात लपून बसला आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाली.

लागलीच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी संपूर्ण तळजाई जंगल परिसरात जावून रात्रीचे अंधारा मध्ये आरोपीचा शोध घेतला असता तो तेथील झाडा-झुडपा मध्ये लपून बसलेला असल्याचे मिळुन आल्याने त्यास पोलीस स्टाफचे मदतीने ताब्यात घेवून,त्याचेकडे अधिक तपास करता,तो दारु पित असताना मयताचा धक्का त्याला लागल्याचे कारणावरुन,त्यातून झालेल्या वाद-विवादातून मयतास डोक्या मध्ये दगड मारुन जीवे ठार मारले असल्याचे कबुली दिली. त्यावरुन आरोपीस नमूद गुन्हयात अटक केली आहे.

**वरीलप्रमाणे भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील अधिकारी व अंमलदार यांनी खुनाचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा ०८ तासाचे आतमध्ये उघडीस आणून कौशल्यपूर्ण कामगिरी केली आहे.**

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे श्री. नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे तत्कालिन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, तसेच पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, विश्वास भाबड, पोलीस उप निरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, सचिन सरपाले, मंगेश पवार, निलेश जमदाडे, अवधतु जमदाडे, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, आशिष गायकवाड, विक्रम सावंत, महेश बारावकर, निलेश ढमढेरे, शैलेंद्र साठे, चेतन गोरे, अभिजीत जाधव, राहुल तांबे, मितेश चोरमोले यांच्या पथकाने केली आहे.